# मराठी न्यूज एक्सप्रेस

मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!

: ९८३४१३८४८२




# 800 कोटींहून अधिक मालमत्ता कर वसूल

## अभय योजनेचा लाभ घेण्याचे पिंपरी-चिंचवड महापालिकेचे आवाहन

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाने चालू आर्थिक वर्षात दि. १ एप्रिल २०२५ ते १४ मार्च २०२६ या कालावधीत तब्बल ८०० कोटी ८४ लाख रुपयांचा मालमत्ता कर वसूल केला आहे. नागरिकांचा वाढता प्रतिसाद, कर संकलन विभागाचे नियोजनबद्ध कामकाज, विविध सवलतींची अंमलबजावणी तसेच कर भरण्यासाठी उपलब्ध करून दिलेल्या ऑनलाइन व ऑफलाइन सुविधांमुळे कर संकलनात लक्षणीय वाढ झाली आहे. कर भरण्यास चांगला प्रतिसाद दिल्याबद्दल महापौर रवि लांडगे यांनी सर्व करदात्यांचे आभार मानले आहेत. तसेच ज्या थकबाकीदारांनी अद्याप मालमत्ता कर भरला नाही, त्यांनी अभय योजनेचा लाभ घेऊन लवकरात लवकर मालमत्ता कर भरावा, असे आवाहन देखील त्यांनी केले आहे.

थकबाकीदार नागरिकांना दिलासा देण्यासाठी महापालिकेमार्फत अभय योजना लागू करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत थकीत मालमत्ता कराची रक्कम एकरकमी भरल्यास दि. १ मार्च २०२६ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत विलंब दंडाच्या रकमेवर तब्बल ९० टक्के सवलत देण्यात येत आहे. अभय योजनेचा लाभ घेण्यासाठी अवघे १७ दिवस शिल्लक राहिले आहेत. महापालिकेमार्फत नागरिकांना या योजनेची माहिती देण्यासाठी विविध माध्यमांतून जनजागृती करण्यात येत असून अधिकाधिक नागरिकांनी या योजनेचा लाभ घ्यावा, यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत.

पिंपरी चिंचवड शहरात सध्या निवासी- बिगरनिवासी, औद्योगिक व इतर एकूण ७ लाख ३२ हजार मालमत्तांची नोंद असून त्यापैकी ५ लाख ७५ हजार ३२८ मालमत्ताधारकांनी आतापर्यंत मालमत्ता कराचा भरणा केला आहे. कर भरणाऱ्या नागरिकांची संख्या दरवर्षी वाढत असल्याचे दिसून येत असून शहरातील नागरिकांकडून कर भरण्याबाबत सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. तसेच ज्या मालमत्ताधारकांनी अद्याप मालमत्ता कर भरलेला नाही, अशा थकबाकीदारांवर कर संकलन विभागामार्फत नियमानुसार जप्ती व नळ कनेक्शन खंडित करण्याची कारवाई सुरू करण्यात आली आहे.



> पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांनी मालमत्ता कर वेळेत भरून महापालिकेच्या विकासकामांना मोठा हातभार लावला आहे. नागरिकांचा वाढता प्रतिसाद आणि कर संकलन विभागाचे नियोजनबद्ध कामकाज यामुळे ८०० कोटींहून अधिक कर संकलन शक्य झाले आहे. थकबाकीदार मालमत्ताधारकांनीही अभय योजनेचा लाभ घेऊन थकीत कराची रक्कम भरावी आणि शहराच्या विकासात सहभागी व्हावे.
>
> – रवि लांडगे, महापौर.

### वाकड विभागीय कार्यालयांतर्गत सर्वात जास्त वसुली..

» कर आकारणी व कर संकलन विभागाची १ एप्रिल २०२५ पासून ते १३ मार्च २०२६ या कालावधीत वाकड विभागीय कार्यालयांतर्गत सर्वात जास्त वसुली झाली आहे. या कालावधीत या कार्यालयाने १०१ कोटी २१ लाख रुपयांची वसुली केली आहे. तर थेरगाव ८० कोटी ५६ लाख, चिखली कार्यालयाने ६६ कोटी ५४ लाख, किवळे ५५ कोटी ४६ लाख, कस्पटे वस्ती ५२ कोटी ३७ लाख, भोसरी ५१ कोटी ८५ लाख, चिंचवड ५० कोटी ७४ लाख, मोशी ५० कोटी ३४ लाख, पिंपरी वाघेरे ४५ कोटी ६४ लाख, सांगवी ४० कोटी १५ लाख, मनपा भवन ३७ कोटी ११ लाख, आकुर्डी ३६ कोटी ९ लाख, चऱ्होली ३१ कोटी ६१ लाख, फुगेवाडी दापोडी ३० कोटी ८३ लाख, दिघी बोपखेल २४ कोटी ९ लाख, तळवडे २१ कोटी ९ लाख, निगडी प्राधिकरण १७ कोटी ९९ लाख, पिंपरी नगर ७ कोटी १७ लाख.

# दिघीतील सोसायटीत लिफ्टच्या दरवाजात चिमुकलीचा हात अडकला

## सुदैवाने मोठा अनर्थ टळला; दिघी येथील एका सोसायटीतील घटना सीसीटीव्हीत कैद

**पिंपरी | प्रतिनिधी**

लिफ्टचा वापर करताना लहान मुलांकडे दुर्लक्ष करणे किती धोकादायक ठरू शकते, याचा प्रत्यय पिंपरी-चिंचवडमधील दिघी परिसरात आला आहे. एका गृहनिर्माण सोसायटीत लिफ्टच्या दरवाजाच्या सापटीत काही महिन्यांच्या चिमुकलीचा हात अडकला. सुदैवाने, नागरिकांच्या तत्परतेमुळे काही मिनिटांतच तिचा हात बाहेर काढण्यात यश आले आणि मोठा अनर्थ टळला. या घटनेचा थरारक प्रकार सोसायटीतील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला असून व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.



दिघी परिसरातील एका गृहनिर्माण सोसायटीत ही घटना घडली. एक महिला आपल्या काही महिन्यांच्या चिमुकलीसह लिफ्टने वरच्या मजल्यावर जात होती. लिफ्ट इच्छित मजल्यावर थांबल्यानंतर दरवाजा उघडला आणि काही क्षणांत पुन्हा बंद होऊ लागला. त्याचवेळी चिमुकलीने सहजपणे आपला हात दरवाजावर ठेवला होता. दरवाजा बंद होताना तिचा हात सापटीत अडकला. हा प्रकार लक्षात येताच लिफ्टमध्ये उपस्थित महिलेसह इतर नागरिकांमध्ये एकच घबराट उडाली. चिमुकली वेदनेने रडू लागल्याने तिला वाचवण्यासाठी तातडीने प्रयत्न सुरू करण्यात आले. काही मिनिटांच्या प्रयत्नांनंतर तिचा हात सुरक्षित बाहेर काढण्यात आला आणि संभाव्य मोठा अनर्थ टळला.

दरम्यान, या घटनेचा संपूर्ण प्रकार सोसायटीच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला असून तो व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. या घटनेच्या पार्श्वभूमीवर लिफ्टचा वापर करताना विशेषतः लहान मुलांकडे सतत लक्ष ठेवण्याचे आणि काळजी घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

# स्मार्ट सिटीच्या नावाखाली चुकीची कामे

## शिवसेना गटनेते विश्वजित बारणे यांच्याकडून 'पोलखोल'

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरात स्मार्ट सिटीच्या नावाखाली १ हजार कोटी रुपयांची कामे झाली आहेत. अर्बन स्ट्रीटच्या नावाखाली मोठे रस्ते छोटे केले. सायकल ट्रॅक केले. रस्ते अरुंद झाल्याने वाहतूक कोंडीत भर पडत आहे. सीसीटीव्ही कॅमेरे बंद आहेत. अतिशय चुकीची कामे झाली आहेत. या कामांची देखभाल कोण करणार, त्याची जबाबदारी कोण घेणार आहे. स्मार्ट सिटीचा नियोजन शून्य कारभार असून त्यावर नियंत्रण ठेवण्याची मागणी शिवसेना गटनेते विश्वजित बारणे यांनी महापालिका सभेत केली.

पिंपरी-चिंचवड स्मार्ट सिटी कंपनीवर संचालकांची नियुक्ती सर्वसाधारण सभेत करण्यात आली. यावर बोलताना शिवसेना गटनेते विश्वजित बारणे म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून 2017 मध्ये देशातील 100 शहरात स्मार्ट सिटी योजना सुरू केली. पिंपरी-चिंचवडचाही स्मार्ट सिटीत समावेश करण्यात आला. त्याला नऊ वर्षे पूर्ण होत आली, तरी स्मार्ट सिटीची विविध कामे संपूर्ण शहरात सुरू आहेत. स्मार्ट सिटी बंद करण्यासाठी शेवटचे काही महिने राहिले आहेत. या माध्यमातून 980 कोटींची गुंतवणूक शहरात करण्यात आली आहे. 490 कोटी केंद्र, 245 कोटी राज्य सरकार आणि 245 कोटी महापालिकेने दिले आहेत.





शहरात 1 हजार कोटी रुपयांची कामे स्मार्ट सिटीच्या नावाखाली झाली आहेत. स्मार्ट पार्किंग, अर्बन डिझायनिंग अंतर्गत रस्ते, वायफाय, सीसीटीव्ही सर्व्हिलेनस्स, कमांड सेंटर अशी विविध कामे झाली आहेत. स्मार्ट सिटी अंतर्गत बसविलेले एकही सीसीटीव्ही कॅमेरे चालू नाहीत. 8 हजार 790 सीसीटीव्ही कॅमेरे शहरात बसवले आहेत. त्यापैकी 3 हजार 827 कॅमेरे चालू असल्याचे सांगितले जात आहे. पण, प्रत्यक्षात हे सीसीटीव्ही कॅमेरे कार्यान्वित होण्यात अडचण आहे. कमांड सेंटर पूर्ण क्षमतेने कार्यान्वित नाही.

अर्बन स्ट्रीटच्या नावाखाली मोठे रस्ते छोटे केले. सायकल ट्रॅक केले. रस्ते अरुंद झाल्याने वाहतूक कोंडीत भर पडत आहे. स्मार्ट सिटीच्या नावाखाली चुकीची कामे झाली आहेत. या कामांची देखभाल कोण करणार, त्याची जबाबदारी कोण घेणार आहे. स्मार्ट सिटीच्या एकाही प्रकल्पाचे काम महापालिकेच्या माध्यमातून करण्यात येत नाही. नियोजन शून्य कारभार आहे. त्यावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

# दूषित पाण्यामुळे 20 विद्यार्थ्यांची प्रकृती बिघडली

## मोशी येथील आदिवासी शासकीय वसतिगृहातील धक्कादायक प्रकार

**पिंपरी | प्रतिनिधी**

मोशी येथील आदिवासी मुलांच्या शासकीय वसतिगृहात दूषित पाणी पिल्यामुळे २० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांची प्रकृती बिघडल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून पालकांमध्ये संतापाचे वातावरण आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, वसतिगृहातील दूषित पाणी पिल्यानंतर विद्यार्थ्यांना अचानक उलट्या, जुलाब आणि मळमळ असा त्रास सुरू झाला. प्रकृती खालावल्याने सर्व विद्यार्थ्यांना तातडीने भोसरी येथील महानगरपालिकेच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्राथमिक उपचारानंतर काही विद्यार्थ्यांना घरी सोडण्यात आले असून ८ ते १० विद्यार्थ्यांवर अजूनही उपचार सुरू आहेत. सध्या सर्व विद्यार्थ्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती मुख्य वैद्यकीय अधिकारी लक्ष्मण गोफणे यांनी दिली.





दरम्यान, या घटनेनंतर विद्यार्थ्यांनी वसतिगृह प्रशासनाच्या भोंगळ कारभाराचा पर्दाफाश केला आहे. शासनाकडून कोट्यवधी रुपयांचा निधी मिळूनही वसतिगृहातील वॉटर फिल्टर अनेक दिवसांपासून नादुरुस्त असल्याचा आरोप विद्यार्थ्यांनी केला आहे. याबाबत वारंवार तक्रार करूनही दुरुस्ती न झाल्याने विद्यार्थ्यांना बाहेरचे पाणी पिण्याची वेळ आली, असेही त्यांनी सांगितले. यासंदर्भातील व्हिडिओ विद्यार्थ्यांनी सोशल मीडियावर व्हायरल करत स्वच्छ पाण्याची मागणी केली होती.

इतकी गंभीर घटना घडूनही आदिवासी प्रकल्प अधिकारी प्रदीप देसाई यांनी अद्याप कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. आपल्या मुलांच्या जीवाशी खेळ करणाऱ्या जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी पालकांनी केली आहे. दरम्यान, आदिवासी सामाजिक कार्यकर्ते अनिल तिटकारे यांनी या घटनेची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी प्रशासनाकडे केली आहे.

# वाहतूक पोलिसांकडून 375 रिक्षा चालकांवर कारवाई

## स्वारगेट परिसरात बेशिस्त रिक्षा चालकांवर कारवाईचा बडगा; 375 रिक्षांवर कारवाई




**पुणे | प्रतिनिधी**

स्वारगेट येथील देशभक्त केशवराव जेधे चौकात ३७५ बेशिस्त रिक्षा चालकांवर वाहतूक पोलीस आणि प्रादेशिक परिवहन विभागाने (आरटीओ) कारवाई केली. पोलिसांनी रिक्षा चालकांवर दंडात्मक कारवाई केली. या कारवाईत तांत्रिकदृष्ट्या व्यवसाय करण्यास अपात्र असलेल्या दहा रिक्षा जप्त करण्यात आल्या. या कारवाईमुळे स्वारगेट चौकातील वाहतूक सुरळीत होण्यास मदत झाली आहे. बेशिस्तपणे स्वारगेट एसटी स्थानकातील प्रवेशद्वाराच्या परिसरात रिक्षा लावण्यात आल्याने या भागातील वाहतूक विस्कळीत होऊन कोंडी व्हायची.

स्वारगेट परिसर अहोरात्र गजबजलेला असतो. या भागात एसटी थांबा, पीएमपी, तसेच मेट्रो स्थानक आहे. प्रवाशांची वर्दळ असलेल्या स्वारगेट चौकात बेशिस्तपणे रिक्षा चालक व्यवसाय करायचे. एसटी, पीएमपी स्थानकाच्या परिसरात रिक्षा लावण्यात येत असल्याने वाहतूक विस्कळीत व्हायची. वाहतूक कोंडीतून वाट काढत प्रवाशांना या भागातून जावे लागायचे.

बेशिस्त रिक्षाचालकांविरुद्ध तक्रारी करण्यात आल्यानंतर वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त हिंमत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली स्वारगेट वाहतूक विभागाच्या सहायक पोलीस निरीक्षक शोभा क्षीसागर आणि पथकाने या परिसरात बेशिस्त रिक्षा चालकांविरुद्ध कारवाई करण्यासाठी विशेष मोहीम राबविली. ‘क्षमतेपेक्षा जास्त प्रवाशांची वाहतूक, भाडे नाकारणे, तसेच व्यवसायास अपात्र असलेल्या रिक्षा, वाहतूकीस अडथळा निर्माण केल्या प्रकरणी पोलिसांनी तीन दिवसात ३७५ रिक्षा चालकांवर कारवाई केली’, अशी माहिती वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त हिंमत जाधव यांनी दिली.

### स्वारगेट परिसरात नियमित कारवाई

» स्वारगेट परिसरात यापुढील काळात नियमित कारवाई करण्यात येणार आहे. पीएमपी बसला स्वारगेट चौकात वळणाना अडथळा होत होता. सिग्नल तोडण्यात येत असल्याने वाहतूक कोंडी व्हायची. प्रवाशांची गैरसोय होऊ नये, तसेच वाहतुकीला शिस्त लावण्यासाठी यापुढील नियमित कारवाई करण्यात येणार आहे. रिक्षा चालकांनी नियमांचे पालन करावे’, असे आवाहन वाहतूक पोलीस उपायुक्त हिंमत जाधव यांनी केले आहे.

# पाणी तोडण्याची ‘जलसंपदा’ची भूमिका चुकीची

## उलट पुणे महापालिकेचेच त्यांच्याकडे 411 कोटी - आयुक्त नवल किशोर राम



**पुणे | प्रतिनिधी**

पाणी बिलाची ९४८ कोटीची थकबाकी न भरल्यास पुणे शहराचा पाणीपुरवठा बंद करण्याची जलसंपदा विभागाची भूमिका चुकीची आहे. पालिका कार्यक्षेत्रामध्ये पाण्याचा वापर वाणिज्यसाठी अत्यल्प असून औद्योगिक पाणी वापर नाही. तरीही जलसंपंदाकडून औद्योगिक दराने अवाजवी पाणी बिल आकारले जात आहे. हे चुकीचे आहे. पालिकेकडे जलसंपदा विभागाची थकबाकी नाही. याउलट त्यांच्याकडेच महापालिकेचे ४११ कोटी रुपये अतिरिक्त भरले गेले आहेत.

महापालिका आणि जलसंपदा विभागात पाणी उचलण्यावरून आणि बिलाच्या थकबाकीवरून अनेक वर्षांपासून वाद आहेत. महापालिका पाण्याचा औद्योगिक वापर करत नाही, तरीही जलसंपदाकडून औद्योगिक वापराचे बिल लावले जाते, असा आरोप केला जातो. हा वाद गेली अनेक वर्षे सुरूच आहे. दरवर्षी जलसंपदा विभागाकडून महापालिकेला पाणी तोडण्याचा इशारा दिला जातो. त्यावर महापालिका राज्य सरकारकडे पत्रव्यवहार करते. राज्य सरकार यावर काहीही तोडगा काढत नसल्याने हे भिजत घोंगडे कायम आहे. गेल्या महिन्यातही जलसंपदाने ९५३ कोटी रुपयांची थकबाकीची नोटीस बजावली होती. जलसंपदा विभागाने दिलेल्या माहितीनुसार महापालिका दर महिन्याला केवळ दहा कोटींची पाणीपट्टी जमा करत असल्याचे स्पष्ट झाले आहे. पालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने स्पष्ट केले आहे की, शासनाने शहरासाठी १६.३६ टीएमसी पाणी कोटा निश्चित केला असताना जलसंपदा १४.६१ टीएमसी कोटा मंजूर असल्याचे सांगते. दुसरीकडे नोटीसमध्ये ११.६० टीएमसी कोट्याचा उल्लेख करते. महापालिकेची मागणी २१.०३ टीएमसी पाण्याची मागणी आहे. महापालिका क्षेत्रात प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांचा समावेश नाही, तरीही औद्योगिक वापराचे पाणी बिल लावले जाते. बिलाच्या संदर्भात प्राथमिक वाद निवारण अधिकाऱ्यांकडे अपिल प्रलंबित आहे. असे असताना जलसंपदाने ‘पाणी बंद’ची नोटीस देणे चुकीचे आहे. पालिका वर्षाला १७० कोटीची पाणीपट्टी भरते. त्यानुसार दरमहा १४ कोटी रुपये पाणीपट्टी पालिका भरते, असे पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

### महापालिका म्हणते...

» पुणे शहरासाठी शासनाकडून मान्य असलेला कोटा हा महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाचे मार्गदर्शक तत्त्वानुसार घेण्यात आला नसून सदर कोटा हा चुकीच्या धारणेने विचारात घेत आहे.
» पालिका कार्यक्षेत्रामध्ये वाणिज्य वापर हा अत्यल्प असून (२५.४८ एम.एल.डी.) (संपूर्ण पाणीवापराच्या १.५४%) त्यामध्ये सरसकट १५% पाण्याचे परिमाण हे वाणिज्य वापरासाठी गृहीत धरणेत येत आहे.
» शहरामध्ये प्रक्रिया उद्योगाचा पाणीवापर हा शून्य असताना तो सरसकट ५% गृहित धरण्यात येत आहे.

### पाटबंधारेकडून पाणी वापरानुसार केली जाणारी दर आकारणी ( प्रति एक हजार लिटर प्रमाणे )

» निवासी : ६० पैसे
» बिगर निवासी : ३ रुपये २ पैसे
» औद्योगिक वापर : १२.१० रुपये.

“ पाणी बंद करण्याची जलसंपदा विभागाची भूमिका चुकीची आहे. पालिकेकडून औद्योगिक दराने पाणी पट्टी आकारणे चुकीचे आहे. याबाबत महापालिकेने राज्य सरकारकडे पत्रव्यवहार केला आहे. या पाणीपट्टीच्या थकबाकी बाबत राज्यसरकार जो निर्णय देईल. त्यानुसार पालिका कार्यवाही करेल.

- नवल किशोर राम, आयुक्त, महापालिका.

# गॅस सिलिंडरचा काळाबाजार करणाऱ्यांना इशारा

## काळाबाजार करणाऱ्यांचे परवाने निलंबित करू; जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी

**पुणे | प्रतिनिधी**

'युद्धजन्य परिस्थितीत केवळ व्यावसायिक गॅसचा पुरवठा थांबविण्यात आला आहे. मात्र, घरगुती गॅसच्या पुरवठ्यात कोणतीही अडचण नाही. तरीही काही जण या परिस्थितीचा गैरफायदा घेत असून, गॅसचा काळाबाजार करत असल्याच्या तक्रारी आल्या आहेत.

त्यामुळे काळाबाजार करणाऱ्यांचे परवाने निलंबित करू, असा इशारा जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी शुक्रवारी दिला. जिल्ह्यात घरगुती गॅसचा पुरवठा पुरेशा प्रमाणात असून, नागरिकांनी घाबरून जाऊन सिलिंडरसाठी रांगा लावू नयेत, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

डुडी म्हणाले,"व्यावसायिक गॅसचा पुरवठा स्थगित केला असला तरी घरगुती पुरवठ्यावर कोणतेही निर्बंध नाहीत. तसेच पुरेशा प्रमाणात पुरवठाही होत असून सध्याचा साठाही पर्याप्त स्वरूपात आहे. मात्र, परिस्थिती आणखी बिघडू नये, सिलिंडरचा साठा तसेच काळाबाजार करू नये. यासाठी पुरवठा विभागाने दक्षता पथकांची स्थापना केली आहे.

शहर व पिंपरीत तीन पथके तर प्रत्येक तालुक्यात पुरवठा निरीक्षकांच्या अध्यक्षतेखाली पथके पुरवठादारांची अचानक तपासणी करत आहेत."शहरातील व जिल्ह्यातील रुग्णालये आणि शासकीय वसतिगृहांमध्ये सिलिंडरचा पुरवठा प्राधान्याने करण्याचे निर्देश राज्याच्या मुख्य सचिवांनी दिल्याचेही डुडी यांनी स्पष्ट केले आहे.





**अद्याप कोणावरही कारवाई नाही**

साठेबाजी तसेच काळाबाजार होत असल्याच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने शहर व जिल्ह्यासाठी पाच दिवसांपूर्वी स्वतंत्र पथकांची नेमणूक केली होती. गॅस मिळत नसल्याने सर्वत्र रांगा लागलेल्या असून, काळ्याबाजारात अव्वाच्या सव्वा किमतीला सिलिंडर विकले जात आहेत. मात्र, या पथकांच्या हाती काहीही लागले नाही. त्यामुळे अद्याप कुणावरही कारवाई करण्यात आलेली नाही, अशी माहिती अन्नधान्य पुरवठा अधिकारी प्रशांत खताळ यांनी दिली.

# तळेगाव -चाकण शिक्रापूर मार्गाचे काम लवकरच सुरू

## सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचे आश्वासन

**पुणे | प्रतिनिधी**

चाकण - तळेगाव शिक्रापूर चाकण या औद्योगिक वसाहतीतील प्रचंड वाहतूक असलेल्या व मोठी वाहतूक कोंडी असलेल्या महामार्गाचे काम लवकरच सुरू होणार आहे. या मार्गाचे काम मोंटेकार्लो लिमिटेड या कंपनीला देण्यात आले असून हे (बीओटी) 'बांधा वापरा हस्तांतरित करा' तत्त्वावर देण्यात आले आहे.

पुढील चार वर्षात हे काम पूर्ण होईल असे आश्वासन सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी मुंबईत त्यांच्या निवासस्थानी झालेल्या चर्चेत चाकण येथील शिष्टमंडळाला दिले. या मार्गाच्या कामाबाबत मंत्र्यांनी पाठपुरावा करून सकारात्मक भूमिका घेतल्याबद्दल त्यांचे आभार व्यक्त करण्यात आले.

तसे आभार पत्र पत्रकार हरिदास कड, पुणे नाशिक राष्ट्रीय महामार्गाचे समन्वयक दिलीप मेदगे यांनी देऊन त्यांचा सन्मान केला. यावेळी रासेचे सामाजिक कार्यकर्ते गणेश डावरे, काळुस गावचे उद्योजक आकाश पवळे, किरण ढोकणे पाटील आदी उपस्थित होते. चालू अधिवेशनात तळेगाव चाकण शिक्रापूर या मार्गाच्या कामाबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंजुरी बाबत घोषणा केली होती.

पुढील आठवड्यामध्ये या मार्गाच्या निविदा प्रक्रियेला मंजुरी देण्यात येणार असून, लवकर पुढील प्रक्रिया पार पाडण्यात येईल असे मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी आश्वासित केले. यावेळी एमएसआयडीसी (महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ) चे मुख्य अभियंता रणजीत हांडे उपस्थित होते.

या मार्गाचे काम एमएसआयडीसीच्या नियंत्रणाखाली व देखरेखीखाली होणार आहे.या मार्गावर दररोज होणाऱ्या वाहतूक कोंडी बद्दलची तीव्रता मंत्री भोसले यांच्या लक्षात आणून दिली. या महामार्गाला



तात्पुरते रुंदीकरण व दुरुस्तीसाठी बांधकाम विभागाने ५५ कोटी रुपये देऊन काम सुरू केले आहे.

याला गती देण्यात यावी व मुख्य काम सुरू होण्यापूर्वी आपण स्वतः या महामार्गाला भेट दिल्यास उर्वरित कामाला गती मिळेल अशी विनंती दिलीप मेदगे व सकाळचे पत्रकार हरिदास कड यांनी मंत्री भोसले यांना केली. त्यावेळी त्यांनी या महामार्गाची मी पाहणी करेल असे आश्वासन दिले.

निविदा आदेशापूर्वी दुरुस्तीचे काम वेगाने सुरू होईल व त्यानंतर ज्या कंपनीची नियुक्ती झाली आहे त्यांनी जमीन अधिग्रहण रक्कम ही सरकारला जमा करायची आहे. यावर सरकार तातडीने शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला वाटप करणार आहे. तळेगाव ते चाकण या उन्नत मार्गाचे मुख्य काम गतिमान पद्धतीने होईल असे मंत्री भोसले यांनी सांगितले.

वाढत्या औद्योगिकरणामुळे ही समस्या प्रचंड वाढली आहे. मराठवाडा, अहिल्यानगर परिसरातून येणाऱ्या व जेएनपीटी बंदराकडे जाणाऱ्या कंटेनर, ट्रेलर, टँकर वाहतुकीमुळे या रस्त्यावरती प्रचंड ताण येत असून स्थानिक नागरिकांना, कामगारांना याचा खूप त्रास होत आहे दररोज अपघात होत आहेत.

तसेच या वाहतूक कोंडीवर मोठा पर्याय म्हणजे पनवेल, कर्जत ,शिरूर रस्ता याही कामाला गती देण्यात यावी, अशी विनंती निवेदन देऊन चर्चेद्वारे करण्यात आली. तळेगाव चाकण शिक्रापूर या महामार्गाच्या कामाबाबत पुढील प्रक्रिया कशी असेल याबाबत मुख्य अभियंता रणजीत हांडे यांच्यासोबत स्वतंत्र चर्चा करण्यात आली.

यावेळी हांडे यांनी या महामार्गाबाबत एमएसआयडीसी आग्रही आहे. प्राधान्याने यासाठीच्या पुढील प्रक्रिया पार पाडून काम लवकर सुरू होईल असे आश्वासित केले. 'सकाळ'ने तळेगाव चाकण शिक्रापूर या मार्गाच्या वाहतूक कोंडीबाबत तसेच कामाबाबत वेळोवेळी मंत्र्याकडेही पाठपुरावा केला याबाबत मंत्र्यांनीही सकाळचे कौतुक केले.

तळेगाव चाकण शिक्रापूर या मार्गाचे २६ किलोमीटर काम हे तळेगाव ते चाकण रासे फाटा असे चार पदरी उन्नत मार्ग उड्डाणपूल होणार आहे. जमिनीला समतल चार पदरी मार्ग होणार आहे. त्यानंतर रासेफाटा ते शिक्रापूर पर्यंत सहा पदरी मार्ग होणार आहे. या मार्गाचे काम खाजगी कंपनीला देण्यात आलेले आहे. त्यांना राज्य सरकारची वर्कऑर्डर मिळाल्यानंतर हे काम तातडीने सुरू होईल.

हे काम सुमारे ५३ किलोमीटर अंतराचे आहे. सुमारे चार हजार दोनशे सात कोटी रुपयांचे हे काम आहे. हे काम बीओटी तत्वावर होणार आहे. २९ वर्षांच्या डीएफबीओटी तत्त्वावर आधारित हा प्रकल्प आहे. असे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी सांगितले.